# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व. ता. जि. ठाणे.

Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र ३६५** **दिनांक: ३०.१२.२०२१**

## वरसावे पुलाजवळील चौकामध्ये व्हेईक्युलर अंडरपास तयार करावयाचा असल्याने मुंबईकडून वसई-अहमदाबादकडे जाणारी वाहतूक ३ दिवस वळविण्यात आली आहे.

मुंबई-अहमदाबाद हायवे वरील वरसावे जंक्शन येथे नॅशनल हायवे ॲथॉरिटी ऑफ इंडिया (एन.एच.ए.आय.) तर्फे नविन उड्डाणपुलाचे काम चालू आहे. वरसावे चौकामध्ये व्हेईक्युलर अंडरपास (व्हियुपी) चे बांधकाम करण्यासाठी वरसावे चौकामध्ये मुंबईकडून गुजरातकडे जाणारी एक वाहिनी पुर्णपणे बंद करावी लागणार आहे. त्यामुळे मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. व्हेईक्युलर अंडरपासचे पुढिल काम लवकरच सुरु करण्यात येणार असल्याने सदरील काम करतांना भविष्यात येणाऱ्या अडचणी समजून घेण्यासाठी व त्यावर अगाऊ उपाययोजना करण्यासाठी काय काय समस्या उद्‌भउ शकतात याचा सविस्तर अभ्यास करून एन.एच.ए.आय.ला उपाययोजना करणे आवश्यक झाले आहे. त्याकरिता दिनांक ०३/०१/२०२२ रोजी सकाळी ०८.०० वाजले पासून ते दि. ०५/०१/२०२२ रोजी रात्री २०.०० वाजे पर्यंत तीन दिवस वरसावे नाका येथे मुंबईकडून गुजरातकडे जाणारी मुळ वाहिनी इंडीयन ऑईल पेट्रोल पंपासमोरून वाहतूकीसाठी बंद करण्यात येऊन वाहने पर्यायी मार्गाने वाहतूक वळविण्यात येणार असून प्रवाशांना खालीलप्रमाणे पर्यायी मार्ग देण्यात येत आहे.

| अ.क्र. | वाहने | पर्यायी मार्ग |
|---|---|---|
| १. | मुंबई कडून वसई/ पालघर/ गुजरातकडे जाणारी वाहने | • वरसावे नाक्याजवळील इंडीयन ऑईल पेट्रोलपंपाचे अलीकडून महामार्गाला मिळणाया जुन्या घोडबंदर मार्गाने जातील.<br>• सदर मार्गाने वरसावे चौकात मिळून **डावे बाजूस वळून** इच्छित स्थळी जातील. |
| २. | मुंबई कडून ठाणे / नाशीक /पुणे कडे जाणारी वाहने | • वरसावे नाक्याजवळील इंडीयन ऑईल पेट्रोलपंपासमोरील डायव्हर्शन रोडने जातील.<br>• सदर मार्गाने वरसावे चौकात मिळून **ऊजवे बाजूस** |

| | | |
|---|---|---|
| | | **वळून** इच्छित स्थळी जातील. |

तरी जनतेला व वाहन चालकांना कळविण्यात येत आहे की, काशिमीरा बाजूकडून वरसावे नाक्यापर्यंत जाताना त्यांनी तीन दिवस वरील नमुद पर्यायी मार्गाचा वापर करावा. वाहन चालकांनी दिशादर्शक फलकावरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. सदर महामार्गाच्या कामाचे महत्व ओळखून जनतेने वाहतूक पोलीसांनी दिलेल्या निर्देशाचे पालन करुन प्रशासनास सहकार्य करावे याबाबत पोलीसांकडून आवाहन करण्यात येत आहे.

----ooo----